# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला प्र वि, पहिली खबर क्र. FIR No. 08, वर्ष Year 2023, दिनांक Date 28/02/23

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, कलमे Sections 7(अ)
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day सोमवार, तारीख पासून Date from 27/02/23, वेळ Time 14:39, तारीख पर्यंत Date to 27/02/23, वेळ Time 16:25
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 27/02/2023, वेळ Time 11.00
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/2023, तारीख Date 28/02/23, वेळ Time 02.10 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बांद्रा कोर्ट समोरील फुटपाथ, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ........, गांव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name फिरोज टिनूवाला (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name इस्मान टिनवाला
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ........ (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9324489663
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी (वकील)
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता : Address : ........ गल्ली / सर्व नं. Ward ........ घर / नाव नंबर House/Name No. 09 ...... फोन /मो. नंबर Phone/M. No. वसंत विहार, ...... वोटर्स नं. Pan No. / Card No. ........
रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place दुसरा मजला, गांव Village पेडर रोड, पोस्ट Post मुंबई पो.स्टे. P. Stn. 26.
तालुका Taluka ........ जिल्हा Distt. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) दिनेश आबाजी जाधव वय 51 वर्षे रा. ठी. रूम नं. 41, शास्त्रीनगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे रोड, सहार हॉटेलच्या बाजूला विलेपार्ले (पु) 99.
(2) दिपक विलास कदम वय 33 वर्षे रा. ठी. रूम नं. 302, रुत्वीक सोसायटी, से. 15 ए, नविन पनवेल.

यातील फिर्यादी श्री फिरोज उस्मान रिनवाला वय ५७ वर्षे धंदा-नोकरी (वकिल) रा.ठी. ९ वसंत व्हिला, दुसरा मजला पेडर रोड. मुंबई २६. यांच्या स्वतंत्र पानावर जबाब नोंद करण्यात आला असुन त्यास नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(प्रदिप देवकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........ लाचेची रक्कम रु. 2,50,000/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र.07 मधील आलोसे यांनी फिर्यादी यांचे मे. मयुर बिल्डर्स आणि डेव्हलपर्स या फर्मच्या आदर्शनगर विकास सहकारी गृह निर्माण संस्था या रहिवाशी इमारतीचे विकासक म्हणुन निष्कासन करण्याकरीता करावयाची कारवाई लांबणीवर टाकण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण येथील लोकसेवक श्री उमेश पाटील तहसिलदार झो.पु.प्रा. यांच्यावर वैयक्तीक प्रभावाचा वापर करुन रक्कमेची मागणी करुन स्वत:करीता गैर फायदा मिळवण्याच्या हेतूने स्वीकारलेली म्हणून कलम 7 अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या नंतर तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक प्रदीप देवकर.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........, District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

[signature] 28/02/2023

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... प्रदिप दत्तात्रय देवकर
पदनाम Rank ... पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला. प्र. वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

व श्री. विनायक यांच्याशी माझे कामासदंर्भात चर्चा झाली. त्यानंतर श्री. दिनेश जाधव यांनी लाचेची रक्कमेची मागणी केली असता मी माझे कडील अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम ठेवलेले दोन पाकीटे श्री. विनायक यांना दिली असता त्यांनी ती स्विकारून माझे व पंचासमक्ष श्री. दिनेश जाधव यांना दिली असता त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारुन पॅटच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. सदरवेळी मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझा उजवा हात केसावरून फिरवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. विनायक यांस लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

सदर वेळी पोलिसांनी त्या खाजगी इसमांस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव १) दिनेश आबाजी जाधव, , ४१ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी, रा.ठि. रु.नं. ४१, शास्त्री नगर, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे रोड, सहारा हॉटेल समोर, विलेपार्ले (पुर्व), मुंबई २) विनायक उर्फ दिपक विलास कदम, ३३ वर्षे, धंदा – खाजगी नोकरी, रा.ठि. रु.नं. ३०२, रुत्विक सोसायटी, सेक्टर – १५–ए, न्यू पनवेल, असे असल्याचे मला, पंचांना व पोलिस पथकास समजले.

तरी आदर्शनगर को.ऑप. हौ. सोसायटी, हिलाल मस्जिद समोर, आर.ए.के. मार्ग, वडाळा पश्चिम, मुंबई या इमारतीच्या संचालक मंडळ यांनी मी भागीदार असलेल्या मेसर्स मयुर बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स या फर्म विरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, बांद्रा पुर्व, मुंबई येथील कार्यालयात माझे उपरोक्त फर्म विरोधात तक्रार दाखल केलेली होती. नमुद तक्रारीच्या अनुषंगाने झो.पु.प्रा, यांनी माझे फर्मची विकासक म्हणुन असलेली नियुक्ती संपुष्टात आणुन सदर इमारती झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांचेकडे जमा करण्याचे आदेश काढले होते. त्याविरोधात मी अॅपक्स ग्रिव्हिअन्स रिड्रेसल कमिटी (AGRC ) येथे अपील केले होते. (AGRC ) यांनी माझे अपील फेटाळल्यानंतर मी मुंबई हायकोर्ट येथे रिट पिटेशन क्र. १४०९०/२०२२ अन्वये याचीका दाखल केली होती त्याचा निर्णय अदयाप प्रलंबित असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, मुंबई यांनी नोटीसीद्वारे दोन्ही इमारती विरोधात विकासक म्हणुन आमच्या उपरोक्त नमुद फर्मला रद्दबातल ठरविले.

त्यानंतर श्री. दिनेश जाधव यांनी आमच्याशी संपर्क साधुन सदर इमारत झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांचेकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेस विलंब लावण्यासाठी श्री. उमेश पाटील, तहसीलदार, (विशेष कक्ष ०१ ) यांना सांगुन काम करून घेतो असे सांगुन दि. २७/०२/२०२३ रोजी रू. २,५०,०००/– लाचेची मागणी करून खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. दिपक विलास कदम यांनी स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. विनायक उर्फ श्री. दिपक विलास कदम यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाही.

माझी वरील फिर्याद लॅपटॉपवर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचण्यास दिली असता ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( प्रदिप देवकर ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

28/02/2023

त्यानुसार मी उमेश पाटील, तहसीलदार, (विशेष कक्ष ०१), खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. विनायक (तहसीलदार याचे खाजगी सहाय्यक) यांचे विरोधात लाचेची मागणी करीत असलेबाबतचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात इंग्रजी भाषेमध्ये लिहून देवून त्यावर माझी सही केली. त्यानंतर पो.नि. देवकर हे मला स.पो.आ. अविनाश पोवार व स.पो.आ संजु जॉन यांच्याकडे घेवुन गेले. तेथे माझी स.पो.आ. अविनाश पोवार व स.पो.आ संजु जॉन व तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.नि. देवकर यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक २७/०२/२०२३ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. देवकर यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. देवकर यांनी स्वतः स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वतःचे ताब्यात घेतला.

त्यानंतर पो.नि देवकर यांनी दिनांक २७/०२/२०२३ रोजी पंचांसमक्ष श्री. उमेश पाटील, तहसीलदार, (विशेष कक्ष ०१), झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, बांद्रा पुर्व, मुंबई व त्याच्यासोबत असणारे खाजगी इसम यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी/सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पो.नि. देवकर यांनी माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २,५०,०००/– बाबत विचारणा केली असता मी त्यांना माझे बचतीमधील रू. २५,०००/– (रू. ५०० दराच्या ५० दराच्या भारतीय चलनी नोटा) माझेकडे असल्याचे सांगितले. पो.नि. देवकर यांनी पंचासमक्ष उर्वरीत रू. २,२५,०००/– हे खेळण्याच्या नोटा (रू. ५०० दराच्या ४५० खेळण्यातील नोटा) वापरणार असल्याचे सांगितले.

पो.नि. देवकर यांच्या सुचनेप्रमाणे मी झो.पु.प्रा. बांद्रा पुर्व, मुंबई कार्यालयाजवळ गेल्यानंतर पंचांसमक्ष माझा मोबाईल क्र. ९३२४४८९६६३ वरून लोकसेवक श्री दिनेश जाधव यांचा मोबाईल क्र. ८१०८०९१७२९ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व त्यांनी मला झो.पु. प्राधिकरण कार्यालयासमोर असलेल्या अंबर हॉटेल, बांद्रा पुर्व, मुंबई येथे थांबण्यास सांगितले. त्यावेळी खाजगी इसम श्री दिनेश जाधव यांनी त्यांच्यासोबत असलेले श्री. विनायक यांची ते तहसीलदार श्री. उमेश पाटील यांचे खाजगी सहाय्यक (पी.ए) असल्याचे सांगितले. त्यानंतर आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. खाजगी इसम श्री. दिनेश जाधव यांनी सदर इमारत हस्तांतरीत करण्याची प्रक्रीयेस विलंब करण्यासाठी लाचेची रक्कम रू. २,५०,०००/– हे तहसीलदार यांचे खाजगी सहाय्यक (पी.ए) श्री विनायक यांच्याकडे देण्यास सांगितले.

त्यानंतर मी पुन्हा बांद्रा कोर्ट, बांद्रा, पुर्व मुंबई येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ आलो. पो.नि. देवकर यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. विनायक यांनी पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लाचेची रक्कम तात्काळ मागणी केली असल्याने त्वरीत सापळा कारवाई करावयाची आहे, त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या सुचना पो.नि.देवकर यांनी दिल्या.

पो.नि. देवकर यांनी खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझे डोक्यावरून उजवा हात फिरवुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच खाजगी इसम यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर बांद्रा कोर्ट, बांद्रा पुर्व, मुंबई येथे पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम एका पारदर्शक पाकीटात व एका सफेद रंगाच्या पाकीटात ठेवून पाकीटास वरून अँथ्रासीन पावडर लावली व मी परीधान केलेल्या कोटच्या उजव्या बाजुच्या आतील खिशात ठेवली. पो.नि. देवकर यांनी माझे शर्टचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. जायभाये यांचेसह सापळा कारवाईकरीता पायी पाठविले. मी बांद्रा कोर्ट, बांद्र पुर्व, मुंबई मेन गेटजवळ आल्यानंतर पो.नि. देवकर यांच्या सुचनेप्रमाणे मी पंचांसमक्ष माझा मोबाईल क्र.९३२४४८९६६३ वरून लोकसेवक श्री दिनेश जाधव यांचा मोबाईल क्र. ८१०८०९१७२९ वर फोन केला असता त्यांनी तो उचलला व मला सदर ठिकाणी थांबण्याकरीता सांगितले.

त्यानंतर थोडयावेळाने खाजगी इसम श्री. दिनेश जाधव हे बांद्रा कोर्टच्या मेन गेटजवळ आले त्यांनी मला लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना तहसीलदार श्री. उमेश पाटील यांचे खाजगी सहाय्यक(पी.ए) श्री विनायक यांच्याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या मोबाईल फोनवरून श्री. विनायक यांच्या मोबाईल फोनवर फोन केला व त्यांना देखील सदर ठिकाणी बोलावुन घेतले. त्यानंतर माझी खाजगी इसम श्री. दिनेश जाधव

जबाब                                                     दि. २८/०२/२०२३

श्री. फिरोज उस्मान टिनवाला, वय ५७ वर्षे, धंदा – बांधकाम व्यवसाय, रा.ठि.– ९ वसंत व्हिला, दुसरा मजला, पेडर रोड, मुंबई – ४०० ०२६, मो.क्र. ९३२४४८९६६३.

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर रहावयास आहे. माझे सोबत माझे पत्नीसह रहावयास आहे. माझा बांधकाम व लिगल फर्मचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी आदर्शनगर को.ऑप. हौ. सोसायटी, हिलाल मस्जिद समोर, आर.ए.के. मार्ग, वडाळा पश्चिम, मुंबई ४०० ०३१ या सासायटीचे मेसर्स मयुर बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स या फर्म मध्ये भागीदार आहे. माझे आदर्शनगर को. ऑप. हौ. सोसायटी लि., हिलाल मस्जिद समोर, आर.ए.के. मार्ग, वडाळा पश्चिम, मुंबई या इमारतीच्या संचालक मंडळाने मी भागीदार असलेल्या मेसर्स मयुर बिल्डर अॅन्ड डेव्हलपर्स या फर्म विरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा पुर्व, मुंबई ४०० ०५१ येथील कार्यालयात माझे उपरोक्त फर्म विरोधात तक्रार दाखल केलेली होती.

नमुद तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा, यांनी माझे फर्मची विकासक म्हणुन असलेली नियुक्ती संपुष्टात आणत असलेबाबत आदेश जाहीर काढले. त्याविरोधात मी अॅपक्स ग्रिव्हिअन्स रिड्रेसल कमिटी (AGRC) येथे अपील केले असता (AGRC)यांनी माझे अपील फेटाळले. अॅपक्स ग्रिव्हिअन्स रिड्रेसल कमिटी (AGRC) यांनी माझे अपील फेटाळल्यानंतर मी मुंबई हायकोर्ट येथे रिट पिटेशन क्र. १४०९०/२०२२ अन्वये याचीका दाखल केली होती त्याचा निर्णय अदयाप प्रलंबित असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, मुंबई यांनी नोटीसीद्वारे दोन्ही इमारती विरोधात विकासक म्हणुन आमच्या उपरोक्त नमुद फर्मला रद्दबातल ठरविले.

त्यानंतर आम्हाला झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, बांद्रा पुर्व, मुंबई येथील श्री. उमेश पाटील, तहसीलदार, (विशेष कक्ष १) यांचे कार्यालयात सुनावणी करीता बोलाविले. सदर सुनावणी दरम्यान मी श्री. उमेश पाटील, तहसीलदार–१ यांना मुंबई हायकोर्ट येथे सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असताना नविन विकासकाकडुन आम्ही बांधलेल्या दोन्ही इमारतीचा खर्च मिळाल्याशिवाय आमच्या फर्मच्या विरोधात तुम्हाला सुनावणी घेण्याचा व कोणताही नवीन विकासक यांची नेमणुक करण्याचे अधिकार झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण कार्यालयास नसल्याचे लेखी स्वरूपात लिहून दिले आहे.

आम्ही वरीलप्रमाणे लेखी स्वरूपात कळविले असताना देखील श्री. उमेश पाटील, तहसीलदार (विशेष कक्ष ०१) यांनी सदरच्या दोन्ही बिल्डिंग, झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांना हस्तांतरीत करण्याचा बेकायदेशीर आदेश दि. २३/०१/२०२३ रोजी दिला. त्याच्या विरोधात आम्ही मुंबई उच्च न्यायालय तातडीने सुनावणी घेण्याबाबतचा विनंती अर्ज दाखल केला.

त्यानंतर दिनांक २२/०२/२०२३ रोजी सायंकाळी १८.३० वा सुमारास श्री. दिनेश जाधव यांनी तहसीलदार श्री. उमेश पाटील यांच्या तर्फे माझी पत्नी श्रीमती अंबरं टिनवाला यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान सदर इमारत हस्तांतरीत करण्याची प्रक्रीया लांबविण्यासाठी रू. ५,००,०००/– लाचेची मागणी केली. त्यानंतर तडजोडीअंती रू. २,५०,०००/–हे तहसीलदार यांचे खाजगी सहाय्यक(पी.ए) श्री विनायक याचेकडे देण्यास सांगितले.

माझी श्री. उमेश पाटील, तहसीलदार, (विशेष कक्ष ०१), झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण, बांद्रा पुर्व, मुंबई व त्याच्यासोबत असणारे खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व श्री. विनायक यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे दिनांक २७/०२/२०२३ रोजी समक्ष हजर राहून लाप्रवि कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पो.नि. देवकर यांना भेटलो असता त्यांनी श्री. उमेश पाटील व खाजगी इसम श्री. दिनेश जाधव व विनायक यांचे विरोधात लाचेची मागणी करीत असल्याबाबत मला लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले.